
G




।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।
के.के.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष
मा. बाळासाहेब देवराम वाघ
(उर्फ भाऊ)
यांचे रविवार दि. ०६/०२/२०२२ रोजी
रात्री १०.३० वाजता दुखःद निधन झाले.
के.के.वाघ शिक्षण संस्था, नाशिक
व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य
शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व आजी-माजी
विद्यार्थी यांच्यावतीने
।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।


भावपूर्ण
श्रध्दांजली
के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष
मा. बाळासाहेब देवराम वाघ (उर्फ भाऊ)
यांचे रविवार, दि. ०६/०२/२०२२ रोजी
रात्री १०.३० वाजता दु:खद निधन झाले.
के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक
व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य,
शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी यांच्या वतीने
।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।

सर्व मेडिकल/आयुर्वेदिक स्टोअर्स मध्ये उपलब्ध

# ।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



## के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष

# मा. बाळासाहेब देवराम वाघ

## (उर्फ भाऊ)

यांचे रविवार दि. ०६/०२/२०२२ रोजी रात्री १०.३० वा.
दु:खद निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक व्यवस्थापन मंडळ,
प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व
आजी-माजी विद्यार्थी यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली..!**

# के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ काळाच्या पडद्याआड

## वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात आज होणार अंत्यसंस्कार

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ ऊर्फ भाऊ यांचे रविवारी (दि.६) रात्री १०.३० वाजता वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. अंत्यविधी पंचवटी येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात सोमवारी (दि.७) होईल. अंत्यदर्शन दुपारी १२ वाजेपासून ३ वाजेपर्यंत घेता येईल. त्यानंतर दुपारी ३ वाजता त्यांचा पवित्र आत्मा अनंतात विलीन होईल. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

बाळासाहेब वाघ यांचा जन्म सिन्नर तालुक्यातील मेंढी



या छोट्याशा गावी आपल्या आजोळी १९ ऑक्टोबर १९३२ रोजी देवराम ऊर्फ पद्मश्री कर्मवीर काकासाहेब व गीताई वाघ या दाम्पत्याच्या पोटी झाला. त्यांना लहानपणापासून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, कुसुमाग्रज व आजोबा सयाजीबाबा वाघ अशा थोर व्यक्तींचा सहवास लाभला.

**के. के. वाघ संस्थेच्या रोपट्याचे महाकाय वटवृक्षात केले रुपांतर**

बाळासाहेब हे अतिशय निरोगी व समृद्ध आयुष्य जगले. त्यांनी वडील देवराम तथा पद्मश्री (कै) कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने १९७० मध्ये के.के.वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. २००६ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष तर २००६ पासून आजपर्यंत **उर्वरित. पान १२**

# के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ काळाच्या पडद्याआड

अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्ष खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली. त्यांच्या जाण्याने ही पोकळी कधीही न भरुन निघणारी आहे. के. के. वाघ संस्थेच्या रोपट्याचे त्यांनी महाकाय वटवृक्षात रुपांतर केले. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

**विविध संस्थांवर, विविध पदांवर केले काम** : शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे येथे बी.एस्सी. (ॲग्री.) ही पदवी संपादित केल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ १९६०-६१ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील महाराष्ट्र साखर कारखाना येथे कृषी अधिकारी या पदापासून केला. पुढे त्यांनी कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे सचिव म्हणून व नंतर निफाड सहकारी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर म्हणून काम पाहिले. १९७२ ते १९७९, १९८४ ते १९९५ व २००२ ते २००६ अशा विविध कालखंडामध्ये त्यांनी तब्बल २२ वर्षे कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद भूषविले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑप.लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थावर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर कामकाज केले.

## विविध पुरस्कारांनी गौरव

दीर्घकालीन शैक्षणिक, कृषी व सामाजिक कार्याची दखल घेत आजवर बाळासाहेब वाघ यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सन २००८ साली रोटरी क्लब ऑफ नाशिक यांच्याकडून 'नाशिक भूषण' पुरस्कार, २००९ साली पुणे विद्यापीठाकडून ६० व्या वर्धापनदिना निमित्त मानाचा 'जीवन साधना गौरव पुरस्कार', अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल 'EDUPRAENEURS AWARD-2013' पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला, त्याच प्रमाणे, २०१९ मध्ये तंत्रशिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगिरीबद्दल भारती तंत्रशिक्षण संस्था, नवी दिल्ली तर्फे 'लाईफ टाईम एक्सलन्स मानपत्र' पुरस्कार, गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे 'शिक्षण महर्षी' पुरस्काराने सन्मानित, दै.भास्कर वृत्त समुहातर्फे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल 'प्राउड महाराष्ट्रीयन ॲवार्ड-२०१९' या पुरस्काराने सन्मान, २०१८ मध्ये स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पुणे येथे 'पितृ पुरस्कार' तसेच मराठी पत्रकार संघातर्फे सामाजिक योगदानाबद्दल 'समाजरत्न' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

## राज्यस्तरीय संघटनांच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका

महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय संघटना, महाराष्ट्र राज्य खाजगी विनाअनुदानित कृषी व कृषिसंलग्न महाविद्यालय संघटना, महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित तंत्रनिकेतन संघटना या तिन्ही राज्यस्तरीय संघटनांच्या स्थापनेत त्यांची महत्त्वाची भूमिका होती. तर स्थापनेपासून ते आजपर्यंत या तिन्ही संघटनेचे एकोणीस वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. बाळासाहेब यांनी संघटनेचे वेळोवेळी विविध विभागांमार्फत शासनदरबारी प्रश्न मांडून सोडविण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रश्न तडीस नेले.

## सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात बाळासाहेबांचे मोठे काम

*बाळासाहेब वाघ यांच्यावर सुश्रुत हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना शनिवारीच (दि.५) त्यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली होती. रविवारी त्यांच्या निधनाची दुर्दैवी बातमी समजली. सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात काम करताना त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर केले. त्यांच्या निधनाने नाशिकच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.*

**-छगन भुजबळ,** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा पालकमंत्री नाशिक जिल्हा.

## कृषि आणि सामाजिक संस्थांच्या स्थापनेत मोलाचे योगदान

काकासाहेबनगर येथील निफाड तालुका ग्राहक मंडळ, ग्राहक सहकारी संस्था, फळ व भाजीपाला संघ, मेडिकल ट्रस्ट अशा अनेक कृषि आणि सामाजिक संस्थेच्या स्थापनेत त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या पुढाकाराने निफाड तहसील कार्यक्षेत्रात २५० कर्मवीर बंधारे बांधून ते पूर्ण करण्यात आले. या योगदानामुळे निफाड तालुक्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम झाला. महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या दुसऱ्या महाराष्ट्र जलसिंचन आयोगात त्यांची सदस्य म्हणून कामकाज केले. या कार्यामुळे महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनाला नवी दिशा व नवी गती मिळाली.

## विविध क्षेत्रांतील कार्य मौलिक

व्रतस्थ गांधीवादी राहणी व विचारसरणी, आधुनिकतेकडे असलेला कल, शांत, संयमी, कार्यकुशल व त्यागी व्यक्तिमत्त्वाने आकारास आणलेले कृषि, शिक्षण, जलसंधारण, कारखानदारी, संघटन, सहकार या विविध क्षेत्रांमधील कार्य मौलिक व दखलपात्र स्वरूपाचे आहे.

लोकमत

# के.के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** के.के.वाघ शिक्षण संस्थेचे



अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ (९०) यांचे रविवारी (दि.६) रात्री १०.३० वाजता निधन झाले. मागील आठवड्यापासून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

उपचार सुरू असतानाच रविवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी ३ वाजता के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांचे वडील देवराम तथा कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या नंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला.

काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के.के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाल्यापासून ते आजपावेतो संस्थेचे विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली.

शासनाने गठित केलेल्या महाराष्ट्र दुसरा सिंचन आयोगात त्यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, विनाअनुदानित तंत्रनिकेतन आणि विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालय या तिन्ही राज्यस्तरीय संघटनेचे स्थापनेपासून ते १६ वर्षे 'अध्यक्ष' म्हणून कार्यरत होते.

महाराष्ट्र साखर कारखाना (श्रीरामपूर), संजीवनी सहकारी साखर कारखाना (कोपरगाव), निफाड सहकारी साखर कारखाना, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (पुणे), डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरींग को-ऑप.लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थांवर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर मोलाचे योगदान दिले.

# ।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



# कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ

## के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष

**मा. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ**

यांचे आज रविवार, दि. ०६/०२/२०२२ रोजी रात्री १०.३० वाजता दुःखद निधन झाले.

## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

**व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतवर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी यांच्या वतीने**

## भावपूर्ण श्रद्धांजली

- **अंत्यदर्शन : दुपारी १२.०० वाजता**
- **अंत्यविधी : दुपारी ०३.०० वाजता**
- **अंत्यदर्शन व अंत्यविधी हे सोमवार दिनांक ०७/०२/२०२२ रोजी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय कॅम्पस, अमृतधाम, पंचवटी, नाशिक येथे होणार आहे**

टीप : पार्किंग व्यवस्था महाविद्यालयाजवळ असलेल्या पाटाच्या कडेला करण्यात आलेली आहे.

# वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे निधन

**नाशिक : प्रतिनिधी**

के.के.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान आदरणीय.बाळासाहेब देवराम वाघ ऊर्फ भाऊ यांचे रविवार, दिनांक.६ फेब्रवारी २०२२ रोजी १०.३० वाजता वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी पंचवटी येथील, के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात होईल. अंत्यदर्शन आज दुपारी १२ वाजेपासून ३ वाजेपर्यंत होईल त्यानंतर दुपारी ३ वाजता त्यांच्य पवित्र आत्मा अंनतात विलीन होईल. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

बाळासाहेब वाघ यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील मेंढी ह्या छोट्याशा गावी आपल्या आजोळी दि.१९ ऑक्टोबर १९३२ रोजी देवराम ऊर्फ पद्मश्री कर्मवीर काकासाहेब व गीताई वाघ या दाम्पत्याच्या पोटी झाला. त्यांना लहानपणापासून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, कुसुमाग्रज व आजोबा



सयाजीबाबा वाघ अशा थोर व्यक्तींचा सहवास लाभला.

पद्मश्री (कै) कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या नंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के.के.वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. सन २००६ पर्यंत संस्थेचे 'उपाध्यक्ष' तर २००६ पासून आजपर्यंत 'अध्यक्ष' म्हणून तब्बल ५१ वर्ष खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली. त्यांच्या जाण्याने ही पोकळी कधीही न भरुन निघणारी आहे. के के वाघ संस्थेच्या रोपट्याचे त्यांनी महाकाय वटवृक्षात रुपांतर केले. संस्था उभारणीत त्याचा सिंहाचा वाटा होता.

शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे येथे बी.एस्सी.(अॅग्री.) ही पदवी संपादीत केल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याचा प्रारंभ १९६०-६१ साली अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील महाराष्ट्र साखर कारखाना येथे 'कृषी अधिकारी' या पदापासून केला. पुढे त्यांनी कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे 'सचिव' म्हणून व नंतर निफाड सहकारी साखर कारखान्याचे 'जनरल मॅनेजर' म्हणून काम पाहिले. सन १९७२ ते १९७९, १९८४ ते १९९५ व २००२ ते २००६ अशा विविध कालखंडामध्ये त्यांनी तब्बल २२ वर्षे कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्याचे 'अध्यक्ष 'पद भूषविले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑप.लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थावर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर कामकाज केले.

व्रतस्थ गांधीवादी राहणी व विचारसरणी, आधुनिकतेकडे त्यांचा कल राहिला.

**07-02-2022 ,**

**Gavakari**

लोकमत

# के.के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क



**नाशिक** : के.के.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ (९०) यांचे रविवारी (दि.६) रात्री १०.३० वाजता निधन झाले. मागील आठवड्यापासून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

उपचार सुरू असतानाच रविवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी ३ वाजता के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांचे वडील देवराम तथा कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या नंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला.

काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के.के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाल्यापासून ते आजपावेतो संस्थेचे विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली.

शासनाने गठित केलेल्या महाराष्ट्र दुसरा सिंचन आयोगात त्यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, विनाअनुदानित तंत्रनिकेतन आणि विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालय या तिन्ही राज्यस्तरीय संघटनेचे स्थापनेपासून ते १६ वर्षे 'अध्यक्ष' म्हणून कार्यरत होते.

महाराष्ट्र साखर कारखाना (श्रीरामपूर), संजीवनी सहकारी साखर कारखाना (कोपरगाव), निफाड सहकारी साखर कारखाना, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (पुणे), डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरींग को-ऑप.लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थांवर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर मोलाचे योगदान दिले.

Nashik Main
Page No. 8 Feb 07, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

# बाळासाहेब वाघ यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

## के. के. वाघ महाविद्यालय प्रांगणात अंत्यदर्शनासाठी मान्यवरांची रीघ

**पंचवटी : पुढारी वृत्तसेवा**

नाशिकमधील के. के. वाघ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ (९०) यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि.७) दुपारी ३ च्या सुमारास शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी, पंचवटी येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात सोमवारी दुपारी १२ पासून २.३० वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, साहित्य-कलाक्षेत्रातील मान्यवर, संस्थेतील कर्मचारीवर्गाने अंतिम दर्शन घेतले.

गेल्या आठवड्यापासून बाळासाहेब वाघ यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. रविवारी (दि. ६) रात्री १०.३० वाजता उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे चिरंजीव समीर, अजिंक्य वाघ व मुलगी मंजिरी वाघ-कावरे यांनी त्यांना अग्निडाग दिला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

याप्रसंगी विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व कला क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

बाळासाहेब देवराम वाघ यांनी वडील देवराम तथा पद्मश्री (कै.) कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. बाळासाहेब वाघ यांच्या निधनाने शिक्षणमहर्षी हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. वाघ यांचा जन्म सिन्नर तालुक्यातील मेंढी या आजोळी १९ ऑक्टोबर १९३२ रोजी झाला होता. सन २००९ मध्ये पुणे विद्यापीठाकडून त्यांना 'जीवन साधना गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.





नाशिक : कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे पार्थिव फुलांनी सजवलेल्या वाहनातून अंत्यसंस्कारस्थळी आणण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात पार्थिवाला अग्निडाग देताना त्यांचे कुटुंबीय. (छाया : हेमंत घोरपडे)



### शोकसंवेदना...

सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात काम करताना वाघ यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. वाघ शिक्षणसंस्थेच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करण्यास त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या निधनाने कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.

- **छगन भुजबळ**, पालकमंत्री, नाशिक

वडिलांनंतर आम्हा तिन्ही भावंडांना आपुलकीने बोलावून विचारपूस करणारे भाऊ हे एकमेव होते. नाशिक जिल्ह्यात विनायकदादा पाटील यांच्यानंतर बाळासाहेब वाघ हे मला सर्वाधिक भावलेले शांत व संयमी व्यक्तिमत्त्व होय.

- **ॲड. राहुल ढिकले**, आमदार, नाशिक पूर्व

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेले भाऊ आज आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसत नाही. एवढी मोठी संस्था असताना त्यांनी स्वत:साठी कधी दालन तयार केले नाही. ते महाविद्यालयाच्या प्रांगणात खुर्ची टाकून बसत होते.

- **सीमा हिरे**, आमदार, नाशिक पश्चिम

व्यावसायिक शिक्षणसंस्थेचे महाराष्ट्रभर मोठे नाव करण्यात भाऊंचे मोठे योगदान आहे. नवतंत्रज्ञान व ज्ञान आत्मसात करणे, हा त्यांचा गुणधर्म होता. माझ्या व महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

- **डॉ. सुधीर तांबे**, आमदार

शैक्षणिक पंढरीच्या या वारकऱ्याच्या कर्मात खूप मोठे सामर्थ्य होते. मविप्रचा पदभार स्वीकारताना त्यांनी संस्थेच्या नया पैशालाही हात लावू नको असा सल्ला मला दिला होता. त्यांनी आपल्या आचरणातूनही समाजाला आयुष्यभर चांगली शिकवण दिली.

- **नीलिमा पवार**, सरचिटणीस, मविप्र

तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व म्हणजे बाळासाहेब वाघ होय. शिक्षण क्षेत्रात काम करत असताना त्यांनी गुणवत्तेशी कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे आज 'के. के. वाघ' नावारूपाला आली. स्वत:च्या आचरणातूनही समाजाला आयुष्यभर चांगलीच शिकवण दिली.

- **देवयानी फरांदे**, आमदार, नाशिक मध्य


निफाडचे भूमिपुत्र व आमचे मार्गदर्शक भाऊ आज आपल्यात नाहीत, हे दु:ख पचवणे अवघड आहे. त्यांच्या जाण्याने तालुका पोरका झाला आहे. व्रतस्थ गांधीवादी नेते म्हणजे बाळासाहेब वाघ होय.

- **दिलीप बनकर**, आमदार, निफाड

शिक्षण क्षेत्रात कुठलीही संस्था प्रामाणिकपणे कशी मोठी करता येईल, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वाघ होत. हिरे कुटुंबीय आणि वाघ कुटुंबीयांमध्ये नेहमीच जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत. वाघ यांच्या जाण्याने शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण होणार आहे.

- **डॉ. अपूर्व हिरे**, म. गांधी विद्यामंदिर

पुढारी






Nashik Edition
Feb 8, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# आपलं महानगर

# बाळासाहेब वाघ अनंतात विलीन

## के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार

**नाशिक ।** कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ उर्फ भाऊ यांच्यावर सोमवारी (दि.७) अत्यंत शोकाकूल वातावरणात दुपारी ४ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या आठवड्यापासून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. अखेर उपचारादरम्यान रविवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवास चिरंजीव समीर वाघ, अजिंक्य वाघ व मुलगी मंजिरी कावरे-वाघ यांनी अग्निडाग दिला. यावेळी शिक्षण, राजकीय, सामाजिक, कृषी क्षेत्रातील मान्यवरांकडून बाळासाहेब वाघ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



बाळासाहेब वाघ अतिशय निरोगी व समृद्ध आयुष्य जगले. त्यांनी आपले वडील देवराम तथा पद्मश्री (कै.) कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. सन २००६ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष तर २००६ पासून अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्ष खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली. त्यांच्या जाण्याने ही पोकळी कधीही न भरुन निघणारी आहे.

शिक्षण, सामाजिक, सहकार व कृषी क्षेत्रातील दूरदृष्टी असलेले नेतृत्व हरपल्याची भावना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केली. के. के. वाघ संस्थेच्या रोपट्याचे त्यांनी महाकाय वटवृक्षात रुपांतर केले. संस्था उभारणीत त्याचा सिंहाचा वाटा होता. अंत्यसंस्काराप्रसंगी एमकेसीएलचे विवेक सावंत, साखर आयुक्त शेखर गायकवाड, मविप्रचे माणिकराव बोरस्ते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, माजीमंत्री शोभा बच्छाव, नितीन भोसले यांच्यासह शिक्षण संस्थेतील पदाधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, सेवक व कर्मचारी उपस्थित होते.

Nashik Edition
Feb 8, 2022 Page No.
Powered by : eReleGo.com

# आमचे स्फुर्तीस्थान बाळासाहेब वाघ

कर्मवीर काकासाहेब वाघ अर्थात के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ उर्फ भाऊ यांचे रविवारी (दि.६) रात्री १०.३० वाजता वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. भाऊ यांची वृतस्थ गांधीवादी राहणी व विचारसरणी आधुनिकतेकडे असलेला कल, शांत, संयमी, कार्यकुशल व त्यागी व्यक्तीमत्व चिरकाल स्मरणात राहील. के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या इतिहासात त्यांचे नाव आणि कर्तृत्व 'सुवर्णाक्षरांत' कोरले गेले आहे. त्यांचे स्थान प्रत्येकाच्या हृदयात राहील...



**माननीय भाऊ, आजवर अतिशय निरोगी व समृध्द आयुष्य जगले. त्यांनी आपले वडील देवराम तथा पद्मश्री (कै.) कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाल्यापासून ते आजपावेतो संस्थेचे विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे त्यांनी खंबीरपणे धुरा सांभाळली. त्यांच्या जाण्याने ही पोकळी कधीही न भरुन निघणारी आहे. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.**

**नाशिक ।** महाराष्ट्र साखर कारखाना (श्रीरामपूर), संजीवनी सहकारी साखर कारखाना (कोपरगाव), निफाड सहकारी साखर कारखाना, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, डेक्कन शूगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (पुणे), डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑप लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्याची कार्यकारी समिती अशा विविध संस्थांवर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर मोलाचे योगदान दिले. शासनाने गठीत केलेल्या महाराष्ट्र दुसरा सिंचन आयोगात त्यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, विनाअनुदानित तंत्रनिकेतन आणि विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालय या तिन्ही राज्यस्तरीय संघटनेचे स्थापनेपासून ते आजपावेतो गेली १६ वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. अशा विविध पदांवर काम करत असतांना त्यांनी निफाड तालुक्याशी असलेली नाळ कधी तोडली नाही. त्यांच्या माध्यमातून निफाड तालुका ग्राहक मंडळ, काकासाहेबनगर ग्राहक सहकारी संस्था, काकासाहेबनगर फळ व भाजीपाला संघ, मेडीकल ट्रस्ट व निफाड तहसील कार्यक्षेत्रात बांधलेले २५० कर्मवीर बंधारे यांमुळे तालुक्यातील शेतकरी 'सुजलाम-सुफलाम' झाला आहे.

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी दुःखात सहभागी असून, माननिय भाऊ यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**भाऊंचे जीवन म्हणजे आदर्श वस्तूपाठ..!**

ज्ञानेश्वर माऊलींनी 'पसायदान'मध्ये जो उल्लेख केलेला आहे. 'मार्तंड जे तापहीन' आणि 'चंद्रमे जे अलांछन' तो उल्लेख माऊलींनी काही आदर्श व्यक्तिमत्त्वांसदर्भात केलेला असावा. अशी आदर्श व्यक्तिमत्त्वे आपल्याला आजच्या समाजात सापडतील का, हा प्रश्न मला नेहमी पडत आलेला आहे. त्यावेळी भाऊंकडे पाहताना स्वतःच्या विषयामध्ये दिग्गज असलेले भाऊ 'मार्तंड' आहेत. कारण एखादी संस्था शून्यातून निर्माण करून ती उच्चतम लौकिकाप्रत कशी न्यायची, या विद्येत ते मार्तंड आहेत. परंतु स्वतःचा मोठेपणा कोठेही न सांगता, त्यातील अवधित्य-अहंकार निर्माण न होऊ देता निरलस असणारे भाऊंचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे मला नेहमी जाणवते, भाऊ मार्तंड तर आहेतच पण तापहीनही आहेत. कारण त्यांच्याशेजारी बसल्यावर तुम्हाला त्यांच्या झळा बसत नाहीत. तुम्ही अत्यंत सहजपणे त्यांच्याशी संवाद साधू शकतात. त्यामुळे ज्ञानेश्वर माऊलींना अभिप्रेत तापहीन मार्तंड असलेले समाजातील जे थोडे लोक आहेत त्यामध्ये भाऊ हे एक आहेत. ही माझी अढळ निष्ठा आहे.त्याचबरोबर, त्यांच्या संपूर्ण जीवनाकडे बघितले असता त्यावर एकही काळा डाग नाही. त्यादृष्टीने अतिशय शीतल, सोज्वळ आणि अतिशय प्रेमळ असलेल्या भाऊंना 'चंद्रमे जे अलांछन' असे म्हटल्यास ते अतिशयोक्त होणार नाही, अशी भावना एम.के.सी.एल.चे विवेक सावंत यांनी 'कर्मधुरंधर बाळासाहेब वाघ : कार्य आणि कर्तृत्व' या पुस्तकातून व्यक्त केली आहे.

# वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** येथील क. का. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ ऊर्फ भाऊ (९०) यांचे रविवारी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर संस्थेच्या प्रांगणात सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

बाळासाहेब वाघ यांचा जन्म सिन्नर तालुक्यातील मेंढी गावी झाला. त्यांना लहानपणापासून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर, आजोबा सयाजीबाबा वाघ अशा थोर व्यक्तींचा सहवास लाभला. वडिलांनी दिलेला सामाजिक, सांस्कृतिक, सहकार आणि शिक्षणाचा वारसा त्यांनी समर्थपणे पेलला. क. का. वाघ शिक्षण संस्थेत त्यांनी २००६ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. २००६ पासून अखेरच्या क्षणापर्यंत ते संस्थेचे अध्यक्ष म्हणून सक्रिय राहिले. कृषी क्षेत्राचे पदवीधर असलेल्या बाळासाहेब यांनी श्रीरामपूर येथील महाराष्ट्र साखर कारखान्यात कृषी अधिकारी, कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखान्यात सचिव, निफाड सहकारी साखर कारखान्यात महाव्यवस्थापक म्हणूनही जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९७२ ते १९७९, १९८४ ते १९९५ आणि २००२ ते २००६ अशा विविध कालखंडामध्ये त्यांनी तब्बल २२ वर्षे कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद सांभाळले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनीअरिंग को-ऑप.लिमिटेड, डिस्टिलरी




असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थांवर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर कामकाज केले. संघटनेचे वेळोवेळी विविध विभागांमार्फत शासनदरबारी प्रश्न मांडून सोडविण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रश्न तडीस नेले. त्यांना शिक्षण महर्षीसह वेगवेगळ्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सोमवारी संस्थेच्या प्रांगणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निधनाने सामाजिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रात पोकळी निर्माण झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.



पंचवटीतील क. का. वाघ महाविद्यालयात वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी झालेली गर्दी



नाशिक : अभियांत्रिकी महाविद्यालय आवारात के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांना सोमवारी मानवंदना देताना एनसीसीचे विद्यार्थी.

# बाळासाहेब वाघ यांना अखेरचा निरोप

» पान १ वरून

एमकेसीएलचे विवेक सामंत, 'मविप्र'चे पदाधिकारी माणिकराव बोरस्ते, आमदार माणिकराव कोकाटे आदींनी श्रद्धांजली अर्पण केली. अंत्ययात्रा अभियांत्रिकीच्या आवारात आल्यावर प्राध्यापक, शिक्षक आदींनी पुष्पवृष्टी करून श्रद्धांजली वाहिली. एनसीसी छात्र, सुरक्षा रक्षकांनी मानवंदना दिली.

### सिन्नर तालुक्यात जन्म

(कै.) बाळासाहेब वाघ यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९३२ ला मेंढी (ता. सिन्नर) या गावात झाला. त्यांना लहानपणापासूनच कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात, भाऊसाहेब हिरे, दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, कुसुमाग्रजांपासून आजोबा सयाजीराव यांचा सहवास लाभला. पुणे येथील शासकीय कृषी महाविद्यालयातून बी. एस्सी (ॲग्री.) पदवी संपादन केल्यावर सुरवातीचा काहीकाळ श्रीरामपूर साखर कारखान्यावर कृषी अधिकारी म्हणून काम केल्यावर तब्बल २२ वर्षे रानवड सहकारी कारखान्याचे अध्यक्षपद भूषविले.

### अभियांत्रिकीत मोठे योगदान

राज्यातील खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय संघटना, राज्य खासगी विनाअनुदानित कृषी व कृषीसंलग्न महाविद्यालय संघटना, राज्य खासगी विनाअनुदानित तंत्रनिकेतन संघटना अशा तिन्ही संघटनांच्या स्थापनेत दिवंगत बाळासाहेबांनी मोलाची भूमिका बजावली. स्थापनेपासून तब्बल १९ वर्षे ते या तिन्ही संस्थांचे अध्यक्ष होते.

लोकमत

# बाळासाहेब वाघ अनंतात विलीन

पंचवटी : क. का. वाघ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ (९०) यांच्यावर सोमवारी (दि. ७) दुपारी ३ वाजता क.का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलगा समीर व अजिंक्य वाघ, मुलगी मंजिरी कावरे यांनी अग्निडाग दिला.

यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून वाघ यांना श्रद्धांजली अर्पण केली. रविवारी रात्री साडेदहा वाजता वाघ यांची प्राणज्योत मालवली . वाघ यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. सोमवारी दुपारी बारा ते अडीच या वेळेत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी महाविद्यालयाच्या प्रांगणात ठेवले होते. यावेळी साखर आयुक्त शेखर गायकवाड, माणिकराव बोरस्ते, बाळासाहेब क्षीरसागर, आमदार दिलीप बनकर, राहुल ढिकले, सुधीर तांबे, देवयानी फरांदे, सीमा हिरे, शोभा बच्छाव, नितीन भोसले, राहुल अहेर आदींनी अंत्यदर्शन घेतले.

Nashik Main
Page No. 4 Feb 08, 2022
Powered by: erelego.com

# बाळासाहेब वाघ अनंतात विलीन



नाशिक । दि. ७ प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्यावर के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे चिरंजीव समीर, अजिंक्य वाघ व मुलगी मंजिरी कावरे-वाघ यांनी त्यांना अग्निडाग दिला.

याप्रसंगी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व कला क्षेत्रातील विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून श्रद्धांजली अर्पण केली. गेल्या आठवड्यापासून बाळासाहेब वाघ यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान रविवारी त्यांची प्राणज्योत मालवली.

(श्रद्धांजलीपर लेख पान १० वर)

# भावपूर्ण श्रद्धांजली



के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष

## मा. बाळासाहेब देवराम वाघ (उर्फभाऊ)

यांचे रविवार, दि. ०६/०२/२०२२ रोजी
रात्री १०.३० वाजता दुःखद निधन झाले.

**के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक**
**व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य**
**शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी यांचे वतीने**
**भावपूर्ण श्रद्धांजली**

# कार्यकुशल, त्यागी व्यक्तिमत्त्व : बाळासाहेब वाघ



श्रद्धांजली

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ ऊर्फ भाऊ यांचे रविवारी वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. वाघ यांना लहानपणापासून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, कुसुमाग्रज व आजोबा सयाजीबाबा वाघ अशा थोर व्यक्तींचा सहवास लाभला.

बाळासाहेब अतिशय निरोगी व समृद्ध आयुष्य जगले. त्यांनी वडील देवराम तथा पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील वारसा समर्थपणे पुढे चालवला. कर्मवीर वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने १९७० साली त्यांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. २००६ पर्यंत ते संस्थेचे उपाध्यक्ष तर २००६ पासून आजपर्यंत अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली. के. के. वाघ संस्थेच्या रोपट्याचे त्यांनी महाकाय वटवृक्षात रूपांतर केले. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

महाराष्ट्र साखर कारखाना (श्रीरामपूर), संजीवनी सहकारी साखर कारखाना (कोपरगाव), निफाड सहकारी साखर कारखाना, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (पुणे), डेक्कन शिखर संस्था, नॅशनल हेवी इंजिनिअरींग को-ऑप.लि., डिस्टिलरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साखर कारखान्यांची कार्यकारी समिती अशा विविध संस्थांवर त्यांनी संचालक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य अशा विविध पदांवर मोलाचे योगदान दिले. शासनाने गठीत केलेल्या महाराष्ट्र दुसरा सिंचन आयोगात मोलाची कामगिरी केली. महाराष्ट्र राज्य खासगी विनाअनुदानित अभियांत्रिकी, विनाअनुदानित तंत्रनिकेतन आणि विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालय या तिन्ही राज्यस्तरीय संघटनेच्या स्थापनेपासून ते आजपावेतो गेली १६ वर्ष अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. अशा विविध पदांवर काम करताना त्यांनी निफाड तालुक्याशी असलेली नाळ तोडली नाही. त्यांच्या माध्यमातून निफाड तालुका ग्राहक मंडळ, काकासाहेबनगर ग्राहक सहकारी संस्था, काकासाहेबनगर फळ व भाजीपाला संघ, मेडीकल ट्रस्ट व निफाड तहसील कार्यक्षेत्रात बांधलेले २५० कर्मवीर बंधारे यामुळे तालुक्यातील शेतकरी सुजलाम् सुफलाम् झाला आहे.

वाघ यांची व्रतस्थ गांधीवादी राहणी व विचारसरणी, तरीही आधुनिकतेकडे असलेला कल, शांत, संयमी, कार्यकुशल व त्यागी व्यक्तिमत्त्व चिरकाल स्मरणात राहील. वाघ शिक्षण संस्थेच्या इतिहासात त्यांचे नाव आणि कर्तृत्व सुवर्णाक्षरात कोरले गेले आहे. त्यांचे स्थान प्रत्येकाच्या हृदयात राहील.